पुणे पोलीस

**जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर**
P.R.O. Office, Crime Branch, Pune City Ph.020 / 26122478
Adress - POLICE COMMISSIONER OFFICE,Pune City.
NEAR G.P.O.SADHU VASWANI ROAD,
PUNE MAHARASHTRA - 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in

**प्रेसनोट क्र.३०१७, दि.१८/०९/२०१९**

**कोरेगाव पार्क पोलीस स्टेशन, पुणे शहर**
**परराज्यातील मानसिक संतुलन बिघडलेल्या अवस्थेतील उच्च शिक्षित मुलीस सुखरूप दिले वडिलांचे ताब्यात**

दि.१७/०९/२०१९ रोजी कोरेगाव पार्क पोलीस स्टेशन अंतर्गत कोरेगाव पार्क पोलीस चौकी येथे एका इसमाने समक्ष येवून कळविले की, त्यांचे मित्र नोएडा, उत्तर प्रदेश येथे राहणेस असून, त्यांची मुलगी हीचा फोन सध्या बंद आहे व ती कोरेगाव पार्क भागात असून, ती थोडी मानसिक अस्वस्थ आहे व ती एक डमरु गळयात घालून फिरत आहे, असे वर्णन सांगितले. त्यावरुन तात्काळ कोरेगाव पार्क पोलीस स्टेशनकडील श्रीमती चित्रा चौधरी, महिला पोलीस उप निरीक्षक व पोलीस स्टाफ असे कोरेगाव पार्क परिसरात सदर मुलीचा शोध घेत असताना ती रस्त्याने जात असतांना मिळुन आली. तिच्याकडे चौकशी करता ती असंबंध व मनावरील संयम सुटल्यासारखी वागत असल्याचे दिसत असल्याने ती स्वतःस अपाय करण्याची व तिचेपासुन इतरांच्या जिवीतास धोका होण्याची शक्यता असल्याने तिस सुरक्षितपणे महिला पोलीसांकरवी पोलीस स्टेशन येथे आणले व श्री. प्रमोद पत्की सो., वरिष्ठ पोलीस निरीक्षक, कोरेगाव पार्क पो.स्टे. पुणे शहर यांनी सदर मुलीचे वडीलांना फोनद्वारे संपर्क साधला व त्यांना त्यांचे मुलीचे संदर्भाने चर्चा करून त्यांची मुलगी ही आमचे ताब्यात सुरक्षित व सुखरूप असून, ती असंबंध व मनावरील संयम सुटल्यासारखी वागत आहे, तुम्ही पुण्याला या, असे कळविलेवरून, ते नोएडा येथील राहणारे असून, ते तात्काळ पुण्यात येत असल्याचे कळविले. आम्ही सदर मुलीस महिला अधिकारी व महिला पोलीस स्टाफचे मदतीने तिस धीर देवून विश्वासात घेवून तिचेकडे तिचे पुण्यातील नातेवाईक व कामाबाबत विचारपूस केली असता परंतू ती असंबंध बोलत होती व तिची मानसिक स्थिती ठीक नसल्याचे दिसून आले. त्यानंतर आम्ही महिला पोलीसांकरवी तिस चहापान व जेवण दिले. यासाठी दुपारचे ०२.०० वा. ते रात्रौ १०.०० वा. पर्यंत वेळ दयावा लागला. सदर मुलीचे वडील हे समक्ष पोलीस स्टेशन येथे हजर झाले. त्यांच्याकडे चौकशी करता त्यांनी सदर हजर असलेली मुलगी ही माझी मुलगी असुन ती व्यवसाया निमित्त एप्रिल, २०१९ मध्ये पुण्यात आलेली आहे व ती पुण्यातच सध्या राहत आहे. तिच्याशी मी व घरातील लोक नेहमी फोनद्वारे संपर्क करत होतो., परंतु गेले आठ दिवसांपासुन ती असंबंध व मनावरील संयम सुटल्यासारखे बडबड करत असल्याचे मला फोनद्वारे बोलण्यातून जाणवले, असे त्यांनी सांगितले व आता मी तिस समक्ष पाहिले असुन ती असंबंध व मानसिक संयम सुटल्यासारखे बोलत आहे. तिस मी ताब्यात घेवुन तिचे मानसिक तज्ञाकडे उपचारासाठी घेवुन जात आहे, असे सांगितले. सदर मुलीस तिचे वडील व तिचे नातेवाईकांच्या ताब्यात सुखरूप दिलेले आहे. नमूद मुलीचे वडील व तिचे नातेवाईकांनी त्यांची मुलगी सुखरुपरीत्या पुणे पोलीसांच्या तत्परतेने परत मिळाल्याने, त्यांनी पोलीसांचे मनापासून भरभरून कौतुक करून आभार मानले आहे. त्याप्रमाणे मुलीचे वडिलांचे मित्राने cppunetwitter वर twit केले आहे.

सदरची कामगिरी ही कोरेगाव पार्क पोलीस स्टेशनकडील श्री. प्रमोद पत्की, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्रीमती चित्रा चौधरी पोलीस उप निरीक्षक, प्रकाश लंघे, सहा.पोलीस फौजदार व महिला पोलीस कर्मचारी हर्षदा शिंदे, वर्षा गावडे, जयश्री ढोमे, ज्योती कांबळे, प्रीती धुमाळ, रोहिणी दुंडे, सुनिता खोमणे यांनी केलेली आहे.